**नियमीत दिवाणी मुकादमा कमांक २७५/१९८५, ३५०/१९९६, १२७/२००८, २३८/२००८, ३५१/२०१२, ३७/२०१३, १६९/२०१४, २८८/२०१४, ३९६/२०१४, १५/२०१६, ५७/२०१६ व ३९७/२०१६ तसेच**
**अंतिम हुकुमनामा अर्ज क.१३/२०१४, १२/२००५ तसेच**
**दरखास्त क.८३/२००७ तसेच**
**दिवाणी अर्ज क.१५/२०११**

**प्रकरणे बोर्डावर नाहीत, बोर्डावर घेतले.**
**निशाणी कमांक १ वर आदेश पारीत**

**वाचले :**

**१.** माहे फेब्रुवारी २०२० मध्ये झालेली वार्षिक तपासणी. त्यामध्ये उपस्थित आक्षेप.
**२.** ना.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क.A(Spl.)0803/2020/1374/2023 Dtd.31/08/2023.
**३.** मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर यांचे कार्यालयीन पत्र क.जा.क.९१८२/२०२३ दि.०५/०९/२०२३.

वार्षिक तपासणीमध्ये आक्षेप उपस्थित करीत वर दर्शविलेली प्रकरणे तातडीने निर्णयित करण्याचे आदेशित. आदेशित केल्याप्रमाणे प्रकरणे निर्णयित न झाल्यामुळे या न्यायालयाचा खुलासा बोलविला आहे. त्या अनुषंगाने आता तातडीने प्रकरणे निर्णयित होणे जरूरी. ज्यायोगे पुर्तता अहवाल पाठविता येईल. करिता आदेशः—

**आदेश**

**१.** उभय पक्षकारांनी दि.२१/१०/२०२३ रोजी त्यांच्या विद्वान विधिज्ञांसह उपस्थित राहावे. प्रकरण परत्वे पुढील स्टेप्स घ्याव्यात, पुरावा सादर करावा.
**२.** जर वरिष्ठ न्यायालयामध्ये काही प्रकरण दाखल असेल, स्टे असेल, काही पक्षकार मयत असतील तर त्या बाबी न्यायालयास अवगत कराव्यात.
**३.** सर्व संबंधितांना ज्ञात व्हावे करिता सदरचा आदेश या न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा.

Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2023.10.17 10:55:59 +0530

(गणेश अं.घुले)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, इचलकरंजी
जे.ओ.कोड : २५९४.

दिनांक : १६/१०/२०२३.